"क" वर्ग नगरपालिकांना गौण खनिज अनुदान
देण्याबद्दल मर्यादा आहे ती रु. ५.०० लाखा पर्यंत
वाढविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**शासन निर्णय क्र. : गोखनि १०९९/प्र.क्र. २०५/ख**
**दि.: ११-७-२०००**

वाचा : शासन निर्णय क्र. एमएमआर १०८१/१३३४ ग-७/दि.१६.१.१९८५

संदर्भाकित शासननिर्णयान्वये "क" वर्ग नगर पालिकांना त्याच्या हद्दीतून उत्खनन केलेल्या गौणखनिजावरील मिळणाऱ्या स्वामित्वधनाच्या रक्कमेपैकी रुपये १.०० लाखाची रक्कम संबंधित "क" वर्ग नगरपालिकेस अनुदान म्हणून देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. आता पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय क्र. एमएमआर १०९९/प्र.क्र. १३३४/ग-७ दि. १६.१.१९८५ अन्वये दिलेल्या आदेशानुसार "क" वर्ग नगरपालिकांना त्यांच्या हद्दीतून उत्खनन केलेल्या गौण खनिजावरील स्वामित्वधनाच्या रुपाने मिळणाऱ्या महसूलाच्या रकमेतून अनुदान म्हणून देण्यात येणारी रु. १.०० लाखापर्यंतची मर्यादा रु. ५.०० लाख पर्यंत वाढविण्यात येत आहे. सदर अनुदानाबाबत शासन निणर्य क्र. एमएमआर १०९९/प्र.क्र. १३३४/ग ७/दि. १६.१.१९८५ अन्वये नमूद केलेली कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासननिर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येत आहे.

प्रस्तूत शासननिर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अौ.सं.क्र. १८६/व्यय - ९ दि. २.६.२००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

(एस. व्ही. नलावंडे)
उपसचिव
महसूल व वन विभाग